## नियमित दिवाणी दावा क्र.१४३/२०२० मधील निशाणी १३५ खालील आदेश

**(आण्णा महार वगैरे वि. पांडु महार वगैरे)**

प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीने प्रतिदाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादीने सदरचा प्रतिदावा गट नं. ६० मधील ५१ गुंठे पैकी मध्यभागातील ५ आणे ४ पैचा हिस्सा, गट नं. ९६ मधील २४ गुंठे पैकी दक्षिणेकडील ५ आणे ४ पैचा हिस्सा, गट नं. ११७ मधील २४ गुंठे पैकी उत्तर बाजू मधील ५ आणे ४ पैचा हिस्सा या मिळकतीबाबत दाखल केला आहे. प्रतिवादीने सदरचा प्रतिदावा वादी विरुध्द कब्जाने मालक झाल्याचे घोषित होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे नि.४८ वरील प्रतिदाव्यामध्ये कलम १ मधील गट नं. ६० व ९६ यांचे वर्णनातील हिश्श्याच्या रकान्यामध्ये टंकलेखन चुक झालेली आहे. गट नं. ६० चे वर्णानाचे हिस्सा रकान्यामध्ये ''मध्यभागातील'' या पैकी ''मध्य'' या अक्षराऐवजी दक्षिण असे टाईप होणे आवश्यक होते. तसेच गट नं. ९६ चे वर्णनातील हिश्श्याच्या रकान्यामध्ये ''दक्षिणेकडील'' ऐवजी ''मध्यभागातील'' असे टंकलिखीत होणे आवश्यक होते.

०३. नि. ४८ वरील प्रतिदाव्यातील कलम ३ मधील बाराव्या ओळीमध्ये ''६०'' च्या ऐवजी ''९६'' व तेराव्या ओळीमध्ये ''९६'' ऐवजी ''६०'' असे आकडे

टंकलिखीत होणे आवश्यक होते. प्रतिदाव्यातील कलम ४ मधील तिस–या ओळीमध्ये ''उत्तर बाजूच्या'' ऐवजी ''मध्यभागातील'' व कलम ४ मधील सातव्या ओळीतील ''सदरचा'' ऐवजी ''दावा मिळकतीमधील'' असे लिहून प्रतिदाव्यास दुरुस्ती होणेत यावी असे कथन केले. प्रतिदाव्यातील कलम ७ मध्ये आठव्या ओळीमध्ये ''नं.१ प्रतिदावा मिळकतीमध्ये'' या शब्दानंतर ''जानेवारी १९५७ पासून'' असा जादा मजकूर लिहून प्रतिदावा दुरुस्त होणेत यावी असे कथन केले आहे.

**०४.** प्रतिवादीने कथन केले की, प्रतिदाव्यातील प्रस्तुत दुरुस्ती ही अंतिम न्यायाच्या दृष्टीने जरुरीची व कायदेशीर आहे. तसेच सदर दुरुस्ती ही Clerical error व टंकलेखनाची चुक अशा स्वरुपाची आहे. त्यामुळे मूळ दाव्यातील वादीचे काहीही नुकसान होणार नाही. सदर प्रतिदावा दुरुस्ती न झाल्यास प्रतिवादीला वेगवेगळ्या प्रकरणांस तोंड द्यावे लागणार आहे व प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सदरची प्रतिदाव्यातील दुरुस्ती ही मूळ दाव्यातील मजकूराशी सुसंगत स्वरुपाची असल्याने दुरुस्ती मंजूर होण्याची विनंती केली.

**प्रतिवादीने मागणी केलेले प्रतिदावाच्या दुरुस्तीचा तपशिल खालीलप्रमाणे–**

**०५.** वादी तर्फे वकिलांनी सदर अर्जास निशाणी १४३ वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन सदरचा अर्जातील मजकूर खोटा व काल्पनिक असून कबूल

नसल्याचे कथन केले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने सन २०११ मध्ये प्रतिदावा केला असून आज ९ वर्षाने प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केला त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत असल्याने चालण्यास पात्र नाही. प्रस्तुत दुरुस्तीमुळे प्रतिदाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होवून तथाकथीत वहिवाटीत संपूर्णतः बदल होत असल्याने अशी दुरुस्ती केल्याने वादीचे दावा मिळकतीत असलेले कायदेशीर हक्क संपुष्टात येणार आहे. प्रतिवादी केवळ प्रतिदाव्यातील उणिवा भरुन काढण्यासाठी सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. सबब प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

०६. प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्यावरील कारणमिमांसेसहीत निष्कर्श खालीलप्रमाणे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्श** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र.१ या अर्जानुसार मागणी करतात त्याप्रमाणे मूळ प्रतिदाव्यातील वादाच्या अंतिम निर्णयाकरीता प्रतिदाव्यामध्ये प्रस्तुत दुरुस्ती करणे आवश्यक आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २ | प्रतिवादी अर्जानुसार मागणी करतात त्यानुसार प्रस्तुत दुरुस्तीस परवानगी मिळणेस पात्र आहेत काय ? | नकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u>**

**०८.** वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीने सदरची दुरुस्ती ही प्रतिदावा दाखल केल्यापासून दहा वर्षांनी मागितली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलते तसेच वादीचा दावा हा उलटतपासासाठी प्रलंबित असताना सदरची दुरुस्ती करता येत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. वादीच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्टर्थ पुढील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली.

Eknath Hegadkar Vs. Aagatrao Ghodake, Writ petition no. 7436 of 2017 wherein Honˈble Bombay High court relied on the basic principles of amendment laid down in Reva–jeetu Builders and Developers vs Narayanswami and Sons and ors (2009) 10 scc 84.

०९. प्रतिवादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुतचे प्रतिदाव्यातील दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचा स्वरुपात बदल होत नाही. तसेच प्रतिवादी त्याचे कोणतेही कथन बदलत नाही. केवळ टंकलिखीत चुकीमुळे प्रस्तुतची दुरुस्ती करावयाची आहे. सबब प्रतिवादीच्या वकीलांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टर्थ पुढील न्यायनिर्णयावरती भिस्त ठेवली,

1. Varun Pahwa Vs Mrs. Renu Chaudhary, AIR 2019 SC 1186, Wherein Hon'ble apex court held that the rules of procedure are handmaid of justice and cannot defeat the substaintive right of parties. Amendment in pleadings cannot be refused nearly because of some mistake, negligence, inadvertence or even in fraction of the rules of procedure.

2. Mohinder Mehra Vs Roop Mehra & ors, AIR 2017 SC 5822, Wherein Hon'ble apex court held that amendment in pleadings can be done at any stage of proceeding but a limitation has been in grafted by proviso that no application for amendment shall be allowed after the trials commence unless court satisfied that in spite of due diligence party could not have raised the matter before the commencement of trial.

१०. वरील दोन्ही न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणातील घटक व कथने वेगवेगळी आहेत. प्रस्तुत प्रकरणांत प्रतिवादीचा प्रतिदावा हा कब्जेवहिवाटीवरुन मालकी घोषित करण्याचा असून वाद मिळकतीच्या वर्णनांत दुरुस्ती करणेबाबत आहे त्यामुळे सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची नाही म्हणून वरील न्यायनिर्णयातील प्रमाण (ratio) प्रस्तुत प्रकरणांत लागू होत नाहीत.

११. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीने मूळ दावा हा त्याच्या दाव्यातील दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीच्या दाव्यामध्ये प्रतिदावा (नि.४८) दाखल केला. प्रतिवादी यांनी नि. ४८ वरील प्रतिदावा हा दि. २८/१२/२००९ रोजी कब्जे वहिवाटीनुसार मालकी जाहीर करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिदावाच्या मिळकतीतील कब्जेवहिवाटीनुसार मालक झाला आहे. प्रतिवादीने प्रतिदावा मिळकतीचे वर्णन नि. ४८ वरील प्रतिदाव्यात नमूद केले आहे व त्या वर्णनामध्ये प्रस्तुतची दुरुस्ती मागीतली आहे. प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये बदल केला तर दाव्याच्या स्वरुपावर परिणाम होतो किंवा कसे हे पाहणे महत्वाचे आहे.

**<u>Nature of suit –</u>**

१२. प्रतिवादीने प्रतिदाव्यातील मिळकतीचा गट नं. ६० चे वर्णानाचे

हिस्सा रकान्यामध्ये ''मध्यभागातील'' या पैकी ''मध्य'' या अक्षराऐवजी ''दक्षिण'' असे टाईप होणे आवश्यक होते. तसेच गट नं. ९६ चे वर्णनातील हिश्श्याच्या रकान्यामध्ये ''दक्षिणेकडील'' ऐवजी ''मध्यभागातील'' असे टंकलिखीत होणे आवश्यक होते. नि. ४८ वरील प्रतिदाव्यातील कलम ३ मधील बाराव्या ओळीमध्ये ''६०'' च्या ऐवजी ''९६'' व तेराव्या ओळीमध्ये ''९६'' ऐवजी ''६०'' असे आकडे टंकलिखीत होणे आवश्यक होते असे कथन केले. प्रतिदाव्यातील कलम ४ मधील तिस–या ओळीमध्ये ''उत्तर बाजूच्या'' ऐवजी ''मध्यभागातील'' नमूद करण्याबाबत दुरुस्ती मागितली आहे. प्रतिवादीने प्रस्तुत दुरुस्ती नुसार मिळकतीचा भाग व दिशा बदललेली आहे. तसेच प्रतिवादीने प्रतिदाव्यात जानेवारी १९५७ पासून त्याची कब्जेवहिवाट नमूद करण्याकरीता प्रस्तुतची दुरुस्ती करण्याची मागणी केलेली आहे. प्रतिवादीचा प्रतिदावा हा कब्जेवहिवाटीनुसार मालकीचा असल्यामुळे जर दावा मिळकतीच्या वर्णनात व स्थानात बदल केला तर प्रतिवादी आजतागायत नमूद केलेल्या वर्णनाच्या मिळकतीमध्ये कब्जामध्ये होता किंवा कसे याबाबत प्रथमदर्शनी शंका निर्माण होते. प्रतिवादीने वादीच्या मूळ दाव्यातील वाद मिळकतीच्या ठराविक भागात कब्जेवाटीनुसार मालकी जाहीर करुन मागितली आहे. मूळ प्रकरण हे वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे त्यामुळे प्रकरणाच्या सद्यस्थितीत जर प्रतिदाव्यातील मिळकतीचे वर नमूद केल्या प्रमाणे स्थान बदलले तर प्रतिवादीची कब्जेवहिवाट बदलत असल्यामुळे वादीची दिशाभुल होते.

१३. प्रतिवादीने प्रतिदावा दाखल केल्यापासुन १० वर्षानंतर प्रस्तुतची

दुरुस्ती मागीतली आहे. वादीचा मुळ दावा हा वादीच्या उलटतपासासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे प्रतिवादीने हे दर्शविणे आवश्यक होते की, दुरुस्ती मागीतलेली बाब ही अथन प्रयत्नानंतर देखील आजतागायत अभिलेखावर आणता आली नसती. परंतु प्रतिवादीने सदर बाब अभिलेखावर आणली नाही. केवळ टंकलेखनाची चुक आहे असे दर्शवुन ताबा असणारी मिळकत सदर दुरुस्तीने बदलली जात आहे. प्रतिदाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादीची निश्चित चतुसिमेच्या आतील जमीनीच्या कब्जेवहीवाटी होती. त्या मिळकतीचे स्थान बदलल्यामुळे कब्जेवहिवाट बदलली जाणार आहे त्यामुळे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपावर देखील परिणाम होतो. दाव्यातील गुंतागुंत वाढुण वादीच्या हितसंबंधास बाधा (Prejudice) येते. सबब मी मुद्दा क्र. १ व २ साठी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत–</u>**

**१४.** मुद्दा क्र. १ व २ बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदविला असल्यामुळे मुद्दा क्र. ३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

नि.१३५ कडील प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/–

विटा. (अ.ब.सोनटक्के)

दि.०१.०८.२०२३ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

विटा, ता.खानापूर, जि.सांगली.

CNR No.MHSN150043432020

रे.दि.मु.नं. १४३/२०२०
(आण्णा महार वि जयवंत बारसिंग वगैरे)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | D.S.Kadam, Jr.Clerk |
| Name of the Court | :- | Smt. A. B. Sontakke,<br>2nd Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 01.08.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 04.08.2023 |
| Order uploaded on | :- | 04.08.2023 |